

डीएसके मोटोव्हील्सच्या बेनेली या इटालियन कंपनीसोबत करारप्रसंगी (डावीकडून) स्टेफॅनो मिचेलोटी, स्टेफॅनो लॅंगो, डी. एस. कुलकर्णी आणि शिरीष कुलकर्णी.

# सुपरबाईकच्या बाजारपेठेत 'डीएसके बेनेली'

**पुणे :** डीएसके मोटोव्हील्स या भारतातील सुपरबाइकच्या उद्योगातील शक्तिशाली कंपनीने आज आपल्या बेनेली या ख्यातनाम इटालियन मोटरसायकलिंग कंपनीसोबत भागीदारीची घोषणा केली. सन १९११ पासून कार्यरत असलेली बेनेली ही सर्वात जुनी इटालियन मोटासायकल कंपनी आहे.

बेनेली क्यूजे एसआरएलचे मंडल संचालक फ्रँक झुआना, कराराच्या घोषणेच्या वेळी उपस्थित होते. ते म्हणाले, ''इटली, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि स्पेन आदी ३० देशांमध्ये आमचे अस्तित्व निर्माण केल्यानंतर आता जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या दुचाकींच्या बाजारपेठेत जगातील सर्वोत्तम डिझाइनच्या सुपरबाइक्स आणताना आनंद होत आहे. आमचे भागीदार डीएसके यांना भारतीय सुपरबाइकच्या बाजारपेठेचे सखोलज्ञान असून अनुभवही आहे. डीएसके मोटोव्हील्स ही भारतातील सर्वात वेगाने वाढणारी सुपरबाइक कंपनी आहे. डीएसके मोटोव्हील्सचे अध्यक्ष शिरीष कुलकर्णी म्हणाले, ''भारतात इटालियन सुपरबाइक्सची सर्वांत मोठी श्रेणी आणण्यासाठी उत्सुक आहोत. यामुळे भारतीय सुपरबाइक्सच्या उद्योगात क्रांती घडवून आणू. बेनेलीच्या सुपरबाइक्सची तसेच आमच्या विस्तारित डीलरची साखळी निर्माण करण्याच्या क्षमतेची साथ मिळेल, त्यातून प्रत्येक रायडरला काहीतरी मिळेल.'' मार्केटिंगच्या योजनांबाबत बोलताना कुलकर्णी म्हणाले, ''डीएसके बेनेलीकडून पुढील ६-८ महिन्यांमध्ये २० शहरांमध्ये विशेष डीलरशिप नेमल्या जाणार आहेत. सुरुवातीची फेरी मुंबई, पुणे, दिल्ली, हैदराबाद, बंगळुरु, चंदीगढ, चेन्नई आणि कोलकाता येथे पुढील ३-४ महिन्यांमध्ये सुरु होणार आहे.''